नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक ०५/०४/२०२६ (रविवार)

---

## घरफोडीचा गुन्हा उघड, ०२ लाख ४० हजार रूपयांचा संपुर्ण मुद्देमाल जप्त ,वडोदा पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन वडोदा:—** दिनांक ०३/०४/२०२६ रोजी फिर्यादी नामदेव महादेवजी राऊत, वय ४० वर्ष, रा. आसलवाडा ता. कामठी, जि. नागपूर यांनी पोलीस स्टेशन वडोदा येथे तक्रार दिली की, दिनांक ३१/०३/२०२६ रोजी फिर्यादीची मुलगी लिसा हिचा वाढदिवस साजरा करायचा असल्याने मुलीला सोन्याची चेन घालुन देण्यासाठी एक महीन्यापुर्वी कपटात ठेवलेली सोन्याची चेन बघीतली असता लोखंडी कपाटाचे लॉकरमध्ये ठेवलेले सोन्याचे दागिने कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेल्याचे फिर्यादीच्या लक्षात आले. फिर्यादीचे रिपोर्टवरून पोलीस स्टेशन वडोदा येथे अप. क्र. ४२/२६ कलम ३३१(३), ३०५(अ) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा नोंद आहे.

मा. श्री हर्ष ए. पोद्दार ,पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा, श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री संतोष गायकवाड, उपविभागिय पोलीस अधिकारी, उपविभाग कन्हान यांच्या मार्गदर्शनात वडोदा पोलीसांनी सदर गुन्हयाच्या तपासादरम्यान सदर गुन्हयाबाबत फिर्यादीस केलेल्या विचारपुस दरम्यान फिर्यादीने सदर कालावधीमध्ये जे लोक त्याच्या घरी येऊन गेले त्यांच्यावर संशय व्यक्त केला होता. सदर संशयातून फिर्यादी यांचे घरी येणारी त्यांचे दूरच्या नात्यातील आरोपी महिला हिला पथकाने ताब्यात घेतले. महिला आरोपी कडे कौशल्यपुर्ण तपास करीत गुन्ह्यासंबंधाने कौशल्यपुर्ण विचारपुस केली असता तिने तिच्या स्वतःच्या आर्थिक फायद्याकरिता फिर्यादी यांचे सोन्याचे दागिने त्यांचे कपाटातून चोरी केल्याबाबत कबुली दिली. पोलीसांनी पंचासमक्ष गुन्हयात चोरीस

गेलेला संपुर्ण मुद्देमाल सोन्याचे दागिने किंमती २,४०,०००/— रूपये असा मुद्देमाल जप्त केला आहे.






गुन्हा उघड करणारे पथक जप्त मुद्देमालासह

# जनावरांची निर्दयतेने वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद
# ०५ गोवंश जनावरांची सुटका, नरखेड पोलीसांची कामगिरी

पोलीस स्टेशन नरखेड :—दिनांक ०४/०४/२०२६ रोजी नरखेड पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, अवैधरित्या जनावरांची वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी सावरगाव नरखेड रोड, मुंदाफळे कॉलेज समोर नाकाबंदी केली असता नाकाबंदी दरम्यान पिकअप क्र. एम एच— ४०/बी एल—०५४७ मिळुन आले. वाहन चालक दिसले. पोलीसांनी वाहन थांबवुन तपासणी केली असता आरोपी क्रमांक १) चालक नामे आवेश खाँन युनिस खाँन पठाण, वय ३२ वर्षे, रा. चोरखैरी, तह नरखेड हा मिळुन आला. वाहन मालका बाबत विचारणा केली असता तो स्वत: वाहन मालक असल्याची माहीती त्याने दिली तसेच जनावरांचे मालक आरोपी क्रमांक २) ज्ञानेश्वर संतोष नासरे, वय ४४ वर्षे, रा. मन्नातखेडी तह. नरखेड आणि आरोपी क्रमांक ३) पंढरी पिराजी बोरीवार, वय ६५ वर्ष, रा. मन्नातखेडी ता. नरखेड यांच्या सांगण्यावरून जनावरांची अवैधरित्या वाहतुक करीत असल्याबाबत माहीती पोलीसांना समजली. सुटका केलेल्या जनावरांना अमृत गौरक्षण नरखेड येथे देखभालीकरीता दाखल करण्यात आले आहे.

पोलीसांनी पंचासमक्ष वाहनाची तपासणी केली असता त्यामध्ये ५ बैल जनावरे असे मिळुन आले. नमुद जनावरांना कोणतीही चारापाण्याची सोय न करता, वाहनात कोंबुन, त्यांना वेदना होईल,इजा होईल अशा रितीने दोरखंडाने बांधुन, वाहतुक करीत असल्याचे दिसुन आले. पोलीसांनी पंचासमक्ष घटनास्थळावरून एक पिकअप क्र. एम एच— ४०/बी एल—०५४७ किंमती ३,००,०००/—रूपये आणि ५ बैल जनावरे किंमती १,५०,०००/—रूपये असा एकुण ४,५०,०००/— रूपयांचा मुददेमाल जप्त केला आहे. नुमद प्रकरणी आरोपी १) आवेश खाँन युनिस खाँन पठाण, वय ३२ वर्षे, रा. चोरखैरी, तह नरखेड २) ज्ञानेश्वर संतोष नासरे, वय ४४ वर्षे, रा. मन्नातखेडी तह. नरखेड ३) पंढरी पिराजी बोरीवार, वय ६५ वर्ष, रा. मन्नातखेडी ता. नरखेड यांचेविरूद्ध कलम ११(१) (ड) (एच) प्राण्यांचा छळ प्रतिबंध अधि. सहकलम ४९ भा.न्या.सं. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने